# सामायिक प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्यासाठीच्या महत्वाच्या सूचना

## Instructions for CET Application Form

- **उमेदवाराकडे कोणत्याही स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेच्या प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्यापूर्वी आवश्यक असलेली कागदपत्रे आणि इतर बाबी..**
  1. उमेदवाराकडे वैध आणि कार्यरत ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.
  2. प्रोफाईल तयार करताना उमेदवाराने वैध आणि कार्यरत मोबाईल क्रमांक देणे आवश्यक आहे.
  3. उमेदवाराकडे अलीकडील पासपोर्ट साईज फोटो व स्वाक्षरी खालील साईज मध्ये स्कॅन केलेली असावी.
     - पासपोर्ट साईज फोटो - ५० - १०० KB (**केवळ jpg/jpeg format मध्ये**)
     - स्वाक्षरी - upto ८० KB (**केवळ jpg/jpeg format मध्ये**)
     - **PDF Format** मध्ये,
       - १० वी गुणपत्रिका/प्रमाणपत्र
       - १२ वी गुणपत्रिका/प्रमाणपत्र
       - पदवी उत्तीर्ण (ग्रॅज्युएशन) गुणपत्रिका/प्रमाणपत्र
       - अधिवास/रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate)
       - आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
       - जात प्रमाणपत्र
       - जात वैधता (फक्त टीआरटीआय साठी बंधनकारक )
       - उत्पन्नाचा दाखला/प्रमाणपत्र (तीन वर्षाचे, तहसीलदार कार्यालयाने निर्गमित केलेले)
       - नॉन क्रिमिलेअर (महाज्योती साठी बंधनकारक )
       - दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास)
       - अनाथ प्रमाणपत्र (लागू असल्यास)
       - Gazette/Affidavit (लागू असल्यास)

- **उमेदवारांनी कोणत्याही योजनेचा अर्ज भरण्यापूर्वी खालील सूचना लक्षपूर्वक वाचा.**

१. उमेदवारांनी सामायिक प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी संस्थेच्या संकेतस्थळावरील दिलेल्या लिंकवर जावे.

२. लिंक उघडल्यावर त्यावरील 'Registration' या Tab वर क्लिक करावे.

३. त्यातील Profile मध्ये नमूद केलेली माहिती भरावी. यामध्ये काही माहिती ही लाल रंगाच्या '*' चिन्हाने दर्शविली असल्याने ती माहिती उमेदवारांना भरणे बंधनकारक आहे.

४. Registration Form मधील संपूर्ण माहिती भरल्यावर तुमचा Login ID आणि Password येईल. सदरचा जुना Password बदलून विद्यार्थ्यांनी नवीन Password तयार करावा. सदरचा Login ID आणि Password हा संपूर्ण Application Form भरेपर्यंत तसेच Hall Ticket प्रिंट काढणे व इतर सर्व गोष्टींसाठी सांभाळून ठेवणे आवश्यक आहे.

५. संकेतस्थळावरील दिलेल्या लिंकवरील 'Login' या Tab वर क्लिक करावे.

६. उमेदवाराने Application Form मधील नमूद केलेली माहिती भरावी. यामध्ये काही माहिती ही लाल रंगाच्या '*' चिन्हाने दर्शविली असल्याने ती माहिती उमेदवारांना भरणे बंधनकारक आहे. त्याशिवाय आपली त्या योजनेसाठीची नोंदणी वैध मानली जाणार नाही.

७. सामायिक प्रवेश परीक्षेच्या नोंदणी अर्जामध्ये एकूण ५ पायऱ्या दिलेल्या आहेत. यात,
१. Personal Details २. Address Details ३. Qualification Details ४. Upload Documents
५. Preview

८. अर्जातील पहिली Personal Details पायरी पूर्ण भरून झाल्यावर save & next करून पुढे जावे.

९. त्यानंतर दुसरी पायरी Address Details ची माहिती भरायची आहे. सदर माहिती भरून झाल्यावर save & next करून पुढे जावे.

१०. पायरी तिसरी शैक्षणिक माहिती भरावी. सदर माहिती भरून झाल्यावर save & next करून पुढे जावे.

११. शैक्षणिक माहिती भरून झाल्यावर चौथी पायरी भरतांना उमेदवारांनी आपली शैक्षणिक तसेच इतर कागदपत्राच्या स्कॅन कॉपी अर्जात नमूद केलेल्या size मध्ये तयार करून ठेवाव्यात. प्रत्येक कागदपत्राची size खालील प्रमाणे असेल.

- Scanned latest Photograph of the Candidate - only JPG, Size between ५० to १०० KB.
- Scanned Signature of the Candidate -only JPG, Size upto ८० KB.
- Scanned copy of Candidate SSC/ १०th marks sheet/certificate - only PDF Document, Size upto ३०० KB.
- Scanned copy of Candidate Intermediate or HSC/ १०+२ marks sheet/certificate - only PDF Document, Size upto ३०० KB.
- Scanned copy of Candidate Graduation marksheet/certificate – only PDF Document, Size upto ३०० KB. (if applicable)
- Scanned copy of Candidate Post Graduation marksheet/certificate - only PDF Document, Size upto ३०० KB. (if applicable)
- Domicile Certificate - only PDF Document, Size upto ३०० KB.
- Aadhar Card (Front/Back) - only PDF Document, Size upto ३००KB front & back side Mandatory (should be Merge in one PDF)
- Caste Certificate - only PDF Document, Size upto ३०० KB.
- Caste Validity Certificate - only PDF Document, Size upto ३०० KB. (if applicable)
- Income Certificate (Given by Tahsildar) - only PDF Document, Size upto ३०० KB. (Income Certificate of Last ३ years – Mandatory)
- Non-Creamy Layer Certificate - only PDF Document, Size upto ३०० KB. (if applicable)
- Person with Disabilities (PWD) Certificate **(दिव्यांग प्रमाणपत्र)** - only PDF Document, Size upto ३००KB. (if applicable)
- Orphan Certificate **(अनाथ प्रमाणपत्र)** - only PDF Document, Size upto ३०० KB. (if applicable)

- Gazette Certificate/Affidavit (if there is change in name) - only PDF Document, Size upto ३००KB. (if applicable)

१२. उपरोक्त दिलेल्या size मधील कागदपत्रे जोडल्यानंतर save & next बटन दाबल्यावर आपला संपूर्ण भरलेला अर्ज (Preview) येतो. त्यामध्ये काही बदल करावयाचे असल्यास Modify बटनावर क्लिक करावे.

१३. त्यानंतर अर्जाच्या शेवटी एक Declaration दिलेले आहे ते वाचून, त्याखाली दिलेल्या Submit या बटनावर क्लिक करावे. यानंतर पुन्हा एकदा तुम्हाला विचारले जाते की, तुम्ही सदर अर्ज Submit करण्यास तयार आहात का? तेथील Ok बटनावर क्लिक करून आपला अर्ज Submit करावा.एकदा तुम्ही Submit केले की, त्यानंतर तुम्हाला अर्जात कोणताही बदल/दुरुस्ती करता येणार नाही.

१४. यानंतर आपण आपला अर्ज प्रिंट करून घ्यावा किंवा तो आपल्याकडे जतन करून ठेवावा. उमेदवारांच्या कागदपत्रे तपासणीच्या वेळेस उमेदवाराला सदर अर्ज इतर मूळ कागदपत्रासोबत सादर करावा लागेल. सदर अर्ज आपल्याला कोणत्याही कार्यालयाकडून कोणत्याही कारणास्तव पुन्हा प्राप्त करून दिला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१५. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी Apply For New Scheme वर जाऊन उमेदवाराने प्रत्येक योजनेसाठी वेगवेगळा अर्ज भरावा.

१६. अत्यंत महत्वाचे प्रथम योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरताना उपलब्ध करून देण्यात आलेले परीक्षेसंदर्भातील जिल्हा/परीक्षा केंद्रे निवडीचे प्राधान्यक्रम (Exam city preference) हे त्या उमेदवाराकडून भरल्या जाणाऱ्या प्रत्येक योजनेच्या अर्जाकरीता कायम राहतील योजना निहाय वेगवेगळा ऑनलाईन अर्ज भरताना वेगवेगळे परीक्षा केंद्रे /जिल्हा (Exam city) निवडीचे स्वातंत्र्य असणार नाही याची नोंद घ्यावी त्यानुसार विचारपूर्वक परीक्षा केंद्र/जिल्हा निवडीचे प्राधान्यक्रम (Exam city preference) द्यावे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर तसेच परीक्षेच्या वेळापत्रकानुसार यात कुठलाही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१७. अर्जामध्ये पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी हे CET परीक्षेस बसण्यापूर्वी तपासले जाईल जर त्यामधील माहिती किंवा फोटो जुळत नसल्यास अशा उमेदवारांना CET परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१८. फक्त संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाच्या सामायिक चाळणी परीक्षेकरिता दिल्ली हे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. उर्वरित सर्व ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्र येथील नमूद केंद्रावर घेण्यात येईल. ज्या उमेदवारांना एका पेक्षा जास्त प्रशिक्षणासाठी अर्ज करावयाचा आहे अशा उमेदवारांनी याबाबत स्वत:च्या जबाबदारीने परीक्षा केंद्र निवडावीत. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा केंद्र बदलून देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्कॅनींग आणि दस्तऐवज अपलोड करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे :**

ऑनलाइन अर्ज करण्यापूर्वी, उमेदवाराने त्याचे छायाचित्र आणि स्वाक्षरीची स्कॅन केलेली (डिजिटल) प्रतिमा खाली दिलेल्या वैशिष्ट्यानुसार असणे आवश्यक आहे.

- **छायाचित्र (photo) :**

- छायाचित्र (Photo) अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र (Colour Photo) असणे आवश्यक आहे.
- हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर काढलेले रंगीत चित्र (Colour Photo) असल्याची खात्री करा.

- तुमच्या फोटोमध्ये 'रेड-आय' नसल्याचे सुनिश्चित करा.
- जर तुम्ही चष्मा घालत असाल तर त्यात कोणतेही प्रतिबिंब दिसत नाही आणि तुमचे डोळे स्पष्टपणे दिसू शकतील याची खात्री करा.
- डोक्यावर टोपी किंवा डोळ्यावर गडद चष्मा स्वीकार्य नाही.
- कोणत्याही वस्तू किंवा कपड्याने तुमचा चेहरा झाकलेला फोटो नसावा.
- अर्जामध्ये फोटोच्या ठिकाणी फोटो अपलोड न केल्यास परीक्षेसाठी प्रवेश नाकारला जाईल. यासाठी उमेदवार स्वतः जबाबदार राहील.
- प्रवेश अर्जात फोटो आणि स्वाक्षरी योग्यरीत्या अपलोड केली नसेल तर उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही.
- पासपोर्ट साईज फोटो - ५० -१०० KB (केवळ jpg/jpeg format मध्ये) असावा.
- अर्जात नमूद केलेलीच कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे नमूद कागदपत्राऐवजी इतर कोणतीही/खोटी/चुकीची कागदपत्रे अपलोड  केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

- **स्वाक्षरी प्रतिमा (Signature) :**

- अर्जदाराने पांढऱ्या कागदावर निळ्या शाईच्या बॉल पेनाने सही करावी. इतर कोणतीही शाई स्वीकार्य नाही.
- स्वाक्षरी अर्जदाराने केलेली असावी.
- परीक्षेच्या वेळी स्वाक्षरी केलेल्या उपस्थिती पत्रकावर किंवा हॉल तिकिटावर अर्जदाराची स्वाक्षरी नसल्यास किंवा ती अपलोड केलेल्या स्वाक्षरीशी न जुळल्यास अर्जदारास अपात्र घोषित केले जाईल.
- स्वाक्षरी - upto ८० KB (केवळ jpg/jpeg format मध्ये) असावी.

**<u>उमेदवारासाठी ऑनलाईन अर्जाबाबत सर्वसाधारण सूचना :</u>**

- ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर, उमेदवारांने त्याची प्रिंटआउट घेणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये उमेदवाराचे नाव, प्रवर्ग, जन्मतारीख, पत्ता, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी, परीक्षा केंद्र इ. सर्व तपशील नमूद केले आहेत ते अंतिम मानले जातील आणि सबमिट केल्यानंतर कोणतेही बदल/फेरफार करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
- उमेदवारांने ऑनलाइन अर्ज अत्यंत सजगतेने भरावा कारण यासंबंधी उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- अर्जातील तपशील/माहिती चुकीची अथवा अर्धवट ठेवल्यास/सादर केल्यास होणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी विभाग/कार्यालय/संबंधित जबाबदार राहणार नाही.
- इंटरनेट/वेबसाइट सर्व्हरवर जास्त भार असल्यामुळे डिस्कनेक्शन/अक्षमता/वेबसाइटवर लॉग इन करण्यात अयशस्वी होण्याची शक्यता टाळण्यासाठी विहित वेळेत अर्ज सादर करावा जर विहित वेळेत अर्ज सादर न झाल्यास/ सादर करू शकत नसल्याची कोणतीही जबाबदारी विभाग/कार्यालय/संबंधित संस्था यांची राहणार नाही.
- अर्जदाराने त्याच्या/तिच्या अर्जात सादर केलेली कोणतीही माहिती उमेदवारावर वैयक्तिकरित्या बंधनकारक असेल आणि त्यासाठी तो/ती जबाबदार असेल.
- उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती/तपशील प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर खोटे बनावटी असल्याचे आढळल्यास तो/ती कायदेशीर कारवाईस पात्र राहील व अर्ज अपात्र ठरवण्यात येईल.
- अर्ज भरतांना उमेदवारांनी पात्रता निकष पूर्ण केले आहेत याची खात्री करावी.
- कागदपत्रांची पडताळणी न करता ऑनलाईन चाचणीसाठी प्रवेश पूर्णपणे तात्पुरता असेल.
- उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज सादर करण्यासाठी एकापेक्षा जास्त योजनांकरीता अर्ज सादर करण्यासाठी नोंदणी करतेवेळी प्राप्त झालेल्या Login ID व password चा वापर करून New Application या टॅबद्वारे दुसऱ्या योजनेकरीता फॉर्म भरावा. परंतु परीक्षा दिनांक यांच्यात CLASH झाल्यास CET च्या तारखेला कोणताही बदल दिला जाणार नाही .
- उमेदवारांनी ऑनलाइन परीक्षेची तारीख/महत्त्वाचे अपडेट तसेच त्यासंबंधित वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना/माहितीसाठी नियमितपणे संबधित संस्थेच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**<u>अर्ज भरतांना तांत्रिक (Technical) अडचणी उद्भवल्यास,</u>**

**खालील दिलेल्या क्रमांकावर किंवा ई-मेलवर अडचण / समस्या सोडविण्याबाबत संपर्क साधावा. ई-मेलच्या तक्रारीसोबत नोंदणी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आणि जन्मतारीख नमूद करणे अनिवार्य आहे.**

**(सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत)**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा दूरध्वनी |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) | ०२२ ६५९३४००१ |
| २ | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (टीआरटीआय) | ०२२ ६५९३४००३ |
| ३ | छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (सारथी) | ०२२ ६५९३४००५ |
| ४ | महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) | ०२२ ६५९३४००७ |
| ५ | आण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) | ०२२ ६५९३४००९ |

| | | |
|---|---|---|
| | Email ID | cethelpdesk2025@gmail.com |

**अतांत्रिक (Non technical) अडचणी उद्भवल्यास**

**(सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत)**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा दूरध्वनी | संकेतस्थळ |
|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) | ०२० २६३३३३३०<br>०२० २६३३३३३९<br>०२०२६३४३६०० | bartihelpdesk@gmail.com |
| २ | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (टीआरटीआय) | ०२० २६३३०८५४ | helpdesk.cpetptrti@gmail.com |
| ३ | छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (सारथी) | ०२० २५५९२५२०<br>०२० २५५९२५५० | helpdesk.cecsarthi@gmail.com |
| ४ | महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) | ०७१ -२२८७०१२०/१२१ | mahajyotingp@gmail.com |
| ५ | आण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) | ०२२ ४४५१५८५४/ २५५००१९४/२५५००१९५ | arti.cet25@gmail.com |